# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १८७ वा ❑ भारतीय सौर दिनांक १९ भाद्र. शके १९४८, गुरूवार दि.१० सप्टेंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## कर्तृत्व अथांग, तरीही स्त्रियांचा कोंडमारा कायम?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

समाजात महिलांचा होणारा काटूंबिक छळ हा एक गंभीर व कधीही न संपणारा प्रश्न म्हणून उभा ठाकला आहे.आजच्या आधुनिक काळातही स्त्रियांचे कर्तृत्व अथांग असले, तरी त्यांचा मानसिक, सामाजिक आणि भावनिक कोंडमारा अजूनही पूर्णपणे संपलेला नाही.समाजात कितीही उच्च पद, शिक्षण ,संपत्ती नोकरी किंवा कर्तृत्व मिळवले, तरी महिलांना घरगुती हिंसेचा आणि कौटुंबिक छळाचा सामना करावा लागतो, ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे. अनेकदा लोकांचा असा गैरसमज असतो की कौटुंबिक छळ केवळ अशिक्षित किंवा आर्थिकदृष्ट्या परावलंबी महिलांच्या बाबतीतच घडतो, पण वास्तवात कर्तृत्ववान आणि स्वावलंबी महिलाही याला अपवाद नाहीत.

एकीकडे स्त्रिया अंतराळापासून ते कॉर्पोरेट जगतापर्यंत आणि राजकारणापासून ते सीमेवर देशरक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपले नाव उज्ज्वल करत आहेत. मात्र, दुसरीकडे या यशाच्या मागे त्यांना अनेक अदृश्य भिंतींचा आणि जुनाट मानसिकतेचा सामना करावा लागत आहे

आज समाजात अनेक स्त्रिया उच्चशिक्षित, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि मोठ्या पदांवर कार्यरत (कर्तुत्ववान) असूनही त्यांना बंद दाराआड कौटुंबिक हिंसाचाराचा सामना करावा लागतो. ही आपल्या समाजातील अत्यंत क्लेशदायक आणि दुटप्पी बाजू आहे.

शिक्षण घेऊन किंवा स्वकर्तृत्वाच्या बळावर महिलांनी नोकरी मिळवून स्वतःचा ठसा ,प्रतिष्ठा निर्माण केली असली तरी पुरुषी मानसिकता तिचे श्रेष्ठत्व मान्य करायला आजही तयार नाही.

आजही समाजातील किंवा घरातील काही घटकांना स्त्रीचे स्वतःपेक्षा जास्त यशस्वी असणे, जास्त कमावणे किंवा स्वतंत्र विचार असणे पचनी पडत नाही.

राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती स्पर्धांमध्ये ५ सुवर्ण आणि ६ रौप्य पदके पटकावलेल्या अश्विनी यांना कुस्ती वर्तुळात महाराष्ट्राची वाघीण म्हणून ओळखले जात होती,मात्र कौटुंबिक छळपाई तीन मुलींसह तिने आत्महत्या केली.. एक मुलगी जखमी असून तिच्यावर उपचार सुरू आहे.

सासरच्या लोकांकडून सतत शारीरिक आणि मानसिक त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप मृताचे वडील तानाजी शिवाजी मोहिते यांनी केला.वडिलांच्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात पती , सासरे सासू आणि पतीची आत्या विमलबाई यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा (गुन्हा) व कौटुंबिक छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी या प्रकरणी पती आणि सासऱ्याला अटक केली असून सखोल तपास सुरू आहे.

पोलिस तपास करतील,सत्य काय ते समोर येईल,मात्र महिलांवरील कौटुंबिक छळ हा अत्यंत गंभीर सामाजिक व मानवी हक्कांचा प्रश्न असून, त्यावर तातडीने आणि गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

स्त्रीचे आर्थिक सक्षमीकरण हा तिच्या प्रगतीचा मार्ग नक्कीच आहे, पण जोपर्यंत समाजात स्त्री-पुरुष समानतेची आणि आदराची मानसिकता रुजत नाही, तोपर्यंत केवळ कर्तुत्वाच्या जोरावर कौटुंबिक हिंसेला पूर्णविराम मिळणे कठीण आहे.स्त्रीचे कर्तृत्व अथांग आहेच, पण जेव्हा तिला या कोंडमाऱ्यातून मुक्त करून खऱ्या अर्थाने मोकळा श्वास घेता येईल, तेव्हाच तिचे हे कर्तृत्व अधिक विस्तारेल आणि समाजाचाही खऱ्या अर्थाने विकास होईल.

# ६२ वा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा

## हृदयनाथ मंगेशकरांना जीवनगौरव, राणी मुखर्जी-प्रसाद ओकचा विशेष सन्मान







ज्योतिर्मय साहित्य

मुंबई - मुंबई येथे नुकताच ६२ वा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी ज्येष्ठ गायक-संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांना सन २०२५ चा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशीष शेलार यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना जाहीर झालेला स्वर्गीय राज कपूर जीवनगौरव पुरस्कार त्यांच्या पत्नी आणि अभिनेत्री हेलन यांनी स्वीकारला. तर अभिनेता-दिग्दर्शक प्रसाद ओक याला चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. पुरस्कार स्वीकारताना प्रसाद ओकने हा सन्मान आपल्या दिग्दर्शकांना समर्पित केला. ''व्ही. शांताराम यांच्या १२५ व्या जन्मजयंती वर्षात आणि माझ्या १२५ व्या चित्रपटाच्या उंबरठ्यावर हा पुरस्कार मिळतोय. त्यामुळे माझी जबाबदारी आता आणखी वाढली आहे. महाराष्ट्र राज्य निर्मित पहिल्या मराठी सिनेमाचा मी नायक आहे. संत तुकडोची महाराज यांची व्यक्तिरेखा मी साकारतो आहे. माझी जबाबदारी आता अधिक वाढली आहे. हा पुरस्कार मी माझ्या सर्व दिग्दर्शकांना समर्पित करतो. माझे पहिले दिग्दर्शक अरुण सुर्वे ते प्रवीण तरडे, अनंत महादेवन.,'' असं तो यावेळी म्हणाला.

दरम्यान, अभिनेत्री राणी मुखर्जीला स्वर्गीय राज कपूर विशेष योगदान पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना राणीने महाराष्ट्राशी असलेलं आपलं भावनिक नातं व्यक्त केलं. ''महाराष्ट्र माझ्यासाठी फक्त एक राज्य नाही, तर माझी जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे,'' असं ती म्हणाली.

# मालक तुमी आत्महत्या करू नका

ज्योतिर्मय साहित्य

शेतमालकाला आर्त हाक देणाऱ्या बैलांचा मानाचा सण ''बैलपोळा'' कृषिप्रधान संस्कृतीतील ''जगाचा पोशिंदा'' म्हणजे आपला शेतकरी. आणि त्या शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावुन ऊन, वारा, पावसात नेहमी त्याच्यासोबत चालणारा, राबणारा त्याचा सोबती म्हणजे ''सर्जा-राजाची'' देखणी बैल जोडी. त्या सर्जा-राजाचे म्हणजेच बैलांचे आभार व्यक्त करण्यासाठी, आभार मानण्यासाठी हा सण साजरा केला जातो. बैलपोळा हा सण साजरा करण्यामागे एक महत्वाचा उद्देश आहे तो म्हणजे मुक्या जनावरांप्रति आपल्या मनात असलेली कृतज्ञतेची भावना. ती निर्मळ भावना मनोभावे त्यांच्या चरणी अर्पण करण्याचा दिवस. महाराष्ट्रात बैलपोळा अगदी थाटात साजरा करतात.

''बैलपोळा'' हा सण म्हटला कि डोळ्यासमोर सर्वात आधी खेड्यातील सुंदर चित्र उभं राहतं. पहाटेपासून घरातील बायकांची पुरणपोळीच्या गोडधोड स्वयंपाकाची छान लगबग चाललेली असते. घरातील पुरुष मंडळी बैलांच्या सजावटीत व्यस्त असतात. लहानगी, चिमुकली लेकरं बैलांभोवती पिंगा घालण्यात दंग असतात. खेड्यापाड्यात बैलपोळा हा सण अतिशय उत्साहात, आनंदात साजरा केला जातो. या सणाच्या दिवशी खेड्यातील चित्र पाहण्याजोगे असतं. श्रावण अमावस्येला बैलपोळा सण साजरा केला जातो. पोळ्याच्या दिवशी बैलांना, अपार कष्ट



करणाऱ्या त्यांच्या शरीराला शेतीच्या कामातून आराम दिला जातो.

शेतकरी आणि बैल यांच्या नात्यात एकमेकांप्रती असलेलं जीवापाड प्रेम, जिव्हाळा आणि अपार माया न सांगताच दिसून येते. आणि ते प्रेम पोळा ह्या सणाला अजूनच बहरतं. सकाळपासूनच बैलांच्या सजावटीला आनंदाचं उधाण आलेलं असतं. बैलांना गावातील नदीवर अंघोळ घातली जाते. बैलांचे शिंग छान रंग देऊन रंगवले जातात, कपाळी कुंकवाचा टिळा, गळ्यात फुलांच्या माळा, पायांमध्ये चाळ, घुंगरू, अंगावर सुंदर नक्षिकाम केलेलं झूल पांघरली जाते. संध्याकाळी बैलांची पूजा करुन बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घातला जातो. हजारो वर्षांपासून बैलं मानवासाठी शेतात अहोरात्र राबत आली आहेत. बैलांच्या कष्टानंच शेतात हिरवंगार पीक पिकतं.

आणि शेतकरी त्या पिकाचं हिरवंकंच सौन्दर्य बैलाच्या डोळ्यात बघतो. शेतकऱ्याचं जगणं असतातंच ती बैलं. बैलांच्या अपार कष्टामुळेच शेतशिवारं बहरतात. वर्षातला केवळ एक दिवस बैलांना विश्रांती दिली जाते. पण त्या एका दिवसाच्या विश्रांतीने बैलांच्या मेहनतीचे, त्याच्या कष्टाचे पांग फेडता येत नाहीत. पण त्या एका दिवशी बैलांना पुजून शेतकऱ्याच्या मनाला जी शांतता मिळते ती शांतता कुठेतरी उपकार फेडत असल्याची भावना मनी फुलवत असते. बैलांचे रीन तर फेडताच येत नाहीत. शेतकऱ्याच्या कष्टाशिवाय शेतीला आणि बैलांशिवाय काळ्या भुईला कुठलाच पर्याय नाही. खरं तर पोळ्याच्या दिवशी बैलांच्या डोळ्यात एक आस असते, त्याचंही एक म्हणनं असतं.




शेतकऱ्याचं जगणं, हसणं, आयुष्य हे सगळं सर्जा-राजावर अवलंबून असतं. शेतकऱ्याला आणि बैलांना एकमेकांचं सुखः, दुःख खुप जवळून ओळखता येतं. ते दोघेही आयुष्यभर एकमेकांवरच अवलंबून असतात. आपला मालक लयी काबाड कष्ट करतोय, तरिबी मालकाच्या मालाला चांगला भाव मिळत नाही. म्हणून आपला मालक आत्महत्या करतोय. हे त्या बैलांना खुप चांगलं समजतं. ती बैलं डोळ्यात आसवं आणून मालकाची समजूत काढत असतात. या दोघांच्या नात्यातील प्रेम, दोघं मिळून करत असलेले कष्ट सारं रान पीकवितात.

''मालक, तुमीच दरवर्षी पोळ्याला आम्हाला सजवा, सारं गाव फिरवा, औत, नांगराची पूजा करा, दरवर्षी पुरणपोळीचा गोड नैवेद्याचा घास आम्हाला तुम्हीच भरवा. पोळा सणादिवशी बैलं आपल्या मालकाला आर्त हाक देत असतात. कारण, आपला मालक कर्जाच्या फिकीरीत बुडालेला आहे. ते बैलांना चांगलं ठाऊक असतं. पोळा हा सण केवळ एक सण नाही. तर शेतकरी आणि बैल या दोघांच्या नात्याची वीण घट्ट करणारा सण आहे.

***



## प्रा डॉ नीता वानखेडे आयडॉल शिक्षक पुरस्काराने सन्मानित

ज्योतिर्मय साहित्य

कामठी - सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या मराठीच्या प्राध्यापिका डॉ नीता मिलिंद वानखेडे यांना जिल्हा परिषद नागपूरच्या वतीने शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते जिल्हा आयडॉल शिक्षक म्हणून पुरस्कृत करण्यात आले.महाराष्ट्र शासन आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातर्फ दरवर्षी शिक्षक दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना जिल्हा आडॉल शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले जाते. डॉ नीता वानखेडे ह्या मागील २१ वर्षापासून सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालात मराठी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहे.आपल्या सेवेदरम्यान त्यांनी अनेक शैक्षणिक नवोपक्रमात भाग घेऊन विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण शिक्षण दिले.लेखन,वाचन व उल्हास उपक्रमात भरीव कामगिरी करत अनेक ज्येष्ठ व निरक्षांना साक्षर केले.

उल्लास उपक्रम हा केंद्र सरकारचा एक महत्त्वाचा आणि पथदर्शी कार्यक्रम आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला नव भारत साक्षरता कार्यक्रम म्हणतात. या उपक्रमांतर्गत शिक्षण चुकवलेल्या १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या प्रौढांना साक्षर व सक्षम बनविले जाते. डॉक्टर नीता वानखेडे यांनी नवभारत साक्षरता अभियाना अंतर्गत अनेकांना साक्षर बनविले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दहात उप प्राचार्य व्ही बी वंजारी पर्यवेक्षक प्राध्यापक एन डी. मेंढे व इतर सर्व शिक्षकांनी डॉक्टर नीता वानखेडे यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# सार्वजनिक गणेशोत्सव: सामाजिक एकतेचा आणि उत्साहाचा महासोहळा

ज्योतिर्मय साहित्य

पुढील ४/५ दिवसांत अवघ्या महाराष्ट्राचे आणि देशाचे लाडके दैवत, विघ्नहर्ता गणपती बाप्पा यांचे आगमन होत आहे. घराघरांमध्ये बाप्पाच्या स्वागताची तयारी सुरू असतानाच, गल्लोगल्लीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये एक वेगळाच जोश आणि उत्साह पाहायला मिळत आहे. सार्वजनिक गणेशोत्सव हा केवळ एक धार्मिक उत्सव राहिलेला नाही, तर तो आपल्या संस्कृतीचा, कलेचा आणि सामाजिक एकतेचा सर्वात मोठा महासोहळा बनला आहे. बाप्पाच्या आगमनाची ही चाहूल संपूर्ण वातावरणात एक नवी ऊर्जा आणि चैतन्य घेऊन आली आहे.सार्वजनिक गणेशोत्सवाची पार्श्वभूमी अत्यंत गौरवशाली आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ब्रिटीश काळात समाजाला एकत्र आणण्यासाठी आणि लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली होती. आज अनेक वर्षांनंतरही हा सण समाजाला जोडण्याचे तेच पवित्र काम




करत आहे. जात, धर्म, पंथ आणि गरीब-श्रीमंत हे सगळे भेद विसरून लोक बाप्पाच्या चरणी एकत्र येतात. आजच्या धकाधकीच्या आणि व्यस्त जगात, जिथे शेजारी शेजाऱ्याला ओळखत नाही, तिथे सार्वजनिक गणेशोत्सव लोकांना एकत्र आणून संवाद साधण्याची मोठी संधी निर्माण करून देतो.

परंतु गेल्या काही वर्षांमध्ये उत्सवाच्या साजरीकरणांमध्ये खूप बदल झालेला आहे. जसे की डीजे च्या कर्कश्य आवाजात वाजवली जाणारी गाणे तर कुठे नाचगाणी कार्यक्रम, याच्यावर कुठेतरी बंधन आणि आवश्यक आहे.

बाप्पाच्या आगमनाच्या अवघे ५-६ दिवस आधी सार्वजनिक मंडळांची लगबग शिगेला पोहोचली आहे. भव्य आणि आकर्षक देखावे तयार करण्याचे काम रात्रं-दिवस सुरू आहे. कुठे ऐतिहासिक किल्ल्यांची प्रतिकृती उभारली जात आहे, तर कुठे सामाजिक संदेश देणारे जिवंत देखावे तयार होत आहेत. मूर्तिकारांच्या कारखान्यांमध्ये बाप्पाच्या भव्य आणि देखण्या मूर्तींवर शेवटचा हात फिरवला जात आहे. ढोल-ताशा पथकांचा सराव आता अंतिम टप्प्यात आला असून, संध्याकाळच्या वेळी ढोल-ताशांच्या आवाजाने संपूर्ण परिसर दुमदुमून जात आहे. हे वातावरण प्रत्येकाच्या अंगावर शहारे आणणारे आणि मनात उत्सुकता वाढवणारे असते.उत्सवाच्या या काळात केवळ मनोरंजनाचे कार्यक्रम होत नाहीत, तर सामाजिक भानही जपले जाते. अनेक सार्वजनिक मंडळे या १० दिवसांत रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, गरजू विद्यार्थ्यांना मदत आणि वृक्षारोपणासारखे स्तुत्य उपक्रम काही गणेश मंडळे राबवतात. यंदाच्या गणेशोत्सवात आपण सर्वांनी मिळून पर्यावरणपूरक म्हणजेच इको-फ्रेंडली उत्सव साजरा करण्यावर भर दिला पाहिजे. रासायनिक रंगांऐवजी नैसर्गिक रंगांचा वापर आणि प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी शाडूच्या मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून आपण निसर्गाचे रक्षण करू शकतो. तसेच, उत्सवादरम्यान ध्वनी प्रदूषण टाळणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे ही देखील आपली सामाजिक जबाबदारी आहे. आता बाप्पाच्या आगमनाची घटिका जवळ आली आहे. अवघा महाराष्ट्र बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि गणपती बाप्पा मोरया या जयघोषाने संपूर्ण आसमंत भरून निघणार आहे. बाप्पाच्या आगमनाने समाजात सुख, समृद्धी, शांती आणि मुख्य म्हणजे आपापसात जिव्हाळा वाढो, हीच बाप्पाच्या चरणी प्रार्थना. चला तर मग, सर्व मतभेद विसरून, सामाजिक ऐक्याची भावना मनात ठेवून आपल्या लाडक्या सार्वजनिक बाप्पाचे वाजत-गाजत आणि उत्साहात स्वागत करूया !




***




## जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
नही मिळायच खायला
जीव ,जंतू, किडा, मुंगी
सारे जातीन लयाला ||८३६||

अरे बरस पावसा
काय पडलं कोणाला?
शेतात शेतकर्याच
कलेवर झाडाला || ८३७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७२




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य


दुसरी गोष्ट अशी की हे रामनाम मुखाने घेण्यास कोणतेही कष्ट पडत नाही. इतर तपसाधनेत तरी देहाला कष्ट पडतात. त्याचप्रमाणे तीर्थयात्रा वगैरे करायची म्हटले तरी देहाला कष्ट घ्यावेच लागतात. पदरचा पैसा खर्च करावा लागतो. पण रामनाम घेण्यासाठी यातील काहीही करावे लागत नाही. फक्त आपली इच्छा मात्र हवी. त्यासाठी स्वतंत्र वेळ देण्याची आवश्यकता नाही. सर्व संतांनी आपापली कामे करताना मुखाने हरिनामाचा जप सुरु ठेवला होता. आपणही आपली नित्यकर्मे करताना वाचेने किंवा मनाने भगवंताचे नाम घेऊ शकतो.



आपण सामान्य माणसे ! संसारात अडकलेलो असतो. बांधले गेलेलो असतो. पण हे बंधन दिसत नाही आणि कळतही नाही. आपले आयुष्य शेवटपर्यंत संसारासाठी धावाधाव करण्यातच जाते. शेवटी एक वेळ अशी येते की आपण हे सगळे कोणासाठी आणि कशासाठी केले असे वाटून पश्चाताप होतो. पण तेव्हा वेळ निघून गेलेली असते. संसार म्हणजे विवाहित माणसाचा पती, पत्नी, मुले, नातेवाईक असा साधारण अर्थ आपण घेतो. पण जो माणूस जन्माला आला तो या संसारात अडकला. मग तो विवाहित असो वा अविवाहित. संसार या शब्दाचा एक व्यापक अर्थ हे जग असाही आहे. जीवनाबद्दल एका हिंदी गीतात फार सुंदर ओळी आहेत. संसार हैं एक नदिया, दु:ख सुख दो किनारे हैं, ना जाने कहाँ जाए हम बहते धारे हैं ... अशा या संसाररूपी नदीतून तरून जायचं असेल तर रामनामाशिवाय तरणोपाय नाही.

संसार गोड वाटतो, जिव्हाळ्याचा वाटतो पण तो आपला मोठाच शत्रू आहे हे लक्षात येत नाही. ते लक्षात येते तेव्हा आयुष्याची किंमत आपण मोजलेली असते. एखाद्या गोष्टीचे माणसाला जेव्हा व्यसन लागते, तेव्हा ती गोष्ट त्याला अती प्रिय होते. मग ती वाईट आहे हे कळले तरी ती त्याला सोडवत नाही. तंबाखू, दारू इ. चे व्यसन लागलेल्यांची अशीच अवस्था होते.

(क्रमश:)




## ॥ संजय उवाच... ॥


@संजय काव्या पुणे 7743918559



निंदा
कुणाची प्रशंसा नाही केली तरी चालेल पण कधीही कुणाची निंदा करू नये, निंदा केल्याने तुमचा स्वार्थ सर्वांच्या समोर उघड होतो व तुमच्याबद्दलचे मत वाईट होऊ शकते यात फायदा काहीच नसतो पण नुकसान भरपूर होऊ शकते.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## नामाचे प्रेम नामाच्या सहवासाने येईल



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम येण्यासाठी आपल्या प्रेमळ आईकडेच बघा. मुलाला जरा ताप आला तरी आईच्या पोटात धस्स होते, अन्न गोड लागत नाही, झोप लागत नाही, अशा अनेक गोष्टी होतात. थोडक्यात म्हणजे, तिला सर्व बाजूंनी अस्वस्थता उत्पन्न होते. नाम घेण्यात थोडा व्यत्यय आला तर आपली स्थिती तशी होते का ? याचे उत्तर आपल्याला स्वत:कडूनच मिळण्यासारखे आहे. नाम घेणे हा माझा धर्म आहे, ते माझे आद्य कर्तव्य आहे, त्याच्याशिवाय जगणे म्हणजे मेल्यासारखेच आहे, नाम घेण्यात माझे आत्यंतिक हित आहे, किंबहुना मी नामाकरिताच जन्माला आलो आणि तद्रूपच होऊन जाईन, इतक्या प्रज्वलित भावनेने नाम घेणे जरूर आहे; आणि मग प्रेम आले नाही ही गोष्ट शक्यच नाही. प्रेम येत नाही याचा अर्थच हा की, आम्ही नाम खऱ्या आस्थेने घेत नाही. ह्या सर्वांवर उपाय म्हणजे नाम घेण्याच्या निश्चयाने, ते जसे येईल तसे घेत राहणे. तेच नाम आपल्याला एक एक पाऊल पुढे नेऊन ध्येय गाठून देईल. ‘ परिस्थिती चांगली आली म्हणजे नाम घेईन ’ असे म्हणणारा मनुष्य नाम कधीच घेत नाही.

नाम हे मनात किंवा उच्चार करूनही घेता येते. नामात राहावे, म्हणजे अंत:करणाची शुद्धता होईल, आणि अंत:करण शुद्ध झाले की भगवंताचे प्रेम येईल. नुसत्या पुष्कळ जपापेक्षा, विवेकाने आणि विचाराने आलेले प्रेम नामात असणे जरूर आहे. खरे म्हटले म्हणजे नामातच नामाचे प्रेम आहे. ताकात लोणी असतेच, फक्त ते वर दिसत नाही; पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते, तसे भगवंताचे नाम आपण घेतले की त्याचे प्रेम आपोआप वर येते. साध्या शब्दांचादेखील आपल्या वृत्तीवर परिणाम होऊन, तो तो भाव आपल्या मनात जागृत होतो, मग भगवंताच्या नामाने भगवंताचे प्रेम का येणार नाही ? आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो, तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा. पुष्कळ दिवस एका घरात राहिल्याने त्या घराविषयी आपल्याला प्रेम येते ना ? प्रपंचाचे प्रेम आपल्याला सहवासाने आले आहे. तसे नामाच्या अखंड सहवासाने त्याचे प्रेम आपोआपच येईल. उठता-बसता, चालता-बोलता, आपण अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न करावा. कोणतेही व्यसन कालांतराने पचनी पडते, आणि मग मनुष्य जास्त जास्त त्याच्या आधीन जातो. अफूचे पहा ! दिवसेंदिवस त्या माणसाला जास्त अफू लागते. त्याप्रमाणे भगवंताच्या चिंतनाचे आपल्याला व्यसन लागले पाहिजे. कोणतीही चांगली गोष्ट साधायला कठीण असणारच; पण अगदी थोड्या श्रमात पुष्कळ साधून देणारे नामासारखे दुसरे साधन नाही. म्हणून नेहमी मनाने नाम घेत असावे.

नामाचे प्रेम यायला, एक, गुरूंना ते आवडते म्हणून घ्यावे, किंवा दुसरे, नामातच माझे कल्याण आहे, या भावनेने घ्यावे.

***

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

### श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



मंदिरात साजरे होणारे सण व उत्सव
वैशाख नवरात्र
हा उत्सव सर्वात महत्त्वाचा म्हणून मंदिरात साजरा होतो. वैशाख शुक्ल षष्ठी पासून उत्सवाला प्रारंभ होतो. वैशाख शुक्ल चतुर्दशीला श्री नरसिंह जयंती साजरी केल्या जाते. या काळात दररोज अभिषेक वेद पाठ, पुराण, प्रवचने, हरि कीर्तन, भजन आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या काळात मंदिराला हजारो भाविक दर्शनासाठी भेट देतात. पौर्णिमेच्या दिवशी श्रींच्या पादुकांची पालखी काढली जाते. त्यानंतर दहीहंडी उत्सव साजरा केल्या जातो. याशिवाय गुढीपाडवा रामनवमी, चैत्र व शारदीय नवरात्र, श्रीकृष्ण जन्माष्टमी, विजयादशमी, दीपावली, मकर संक्रांत या दिवशी श्री लक्ष्मी, श्री नरसिंह व भक्त प्रल्हाद यांना नवीन वस्त्रे व दागिने परिधान केली जातात.
कुलधर्म व कुलाचार
आणि कुटुंबांचे कुलदैवत श्री नरसिंह असल्याने ते येथे येऊन महापूजा, पंचामृत अभिषेक, चरण पूजा, महा वस्त्र सेवा, नंदादीप सेवा, महालक्ष्मीला साडी ओटी अर्पण अशा सेवा करतात.




वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194


### हेल्मेट सक्तीचे आम्लेट होऊ नये

मित्रांनो आणि तमाम दुचाकी चालविणार्या माझ्या बंधूभगिनींना नमस्कार.व वाचकहो चालू महिन्याच्या एक तारखेपासून पोलीस प्रशासनातर्फे छत्रपती संभाजी नगरमधे वाहनधारकांना हेल्मेटसक्ती करण्यात आली. खर तर ही सक्ती नाही, तर जबाबदारी आहे, असे मला वाटते. का? प्रवास हा प्रत्येकाला कधी तरी, जवळपास, किंवा रोज कार्यालयात, कामासाठी करावाच लागतो. त्यामुळे दुचाकीवर जाणेयेणे एक भाग आहे. पण काहींचे म्हणणे आहे की," रोड आहे की खड्ड्यात रोड आहे" ही स्थिती आहे, तेव्हा सक्तीदंड नको. पण ती आपली शारिरीक सुरक्षितता व डोके सुरक्षिततेसाठी आहे असे वाटते. मित्रांनो वेगवेगळे मते असू शकते पोलीससक्ती किंवा दंड यापेक्षा सेफपणा महत्वाचा हो का नाही? हो. एक उदा. म्हणून सांगतो, पुण्यात किंवा कोणत्याही नगरात कानठळ्या बसविण्यार्या डीजे साउंड किती घातक आहे. ईथे मला दोन्ही बाजूं स्पष्ट करायचे आहे. पोलीस प्रशासन व स्वतः संचालकानी स्पष्ट केले की ही काही पोलीस पैशे वसुली मोहिम नाही व ही सक्ती म्हणजे सुरक्षेची जाणीव करणे, ही आमची भुमीका आहे. तेव्हा दुचाकी चालकांनी हे समजून घ्या ' रस्ता खड्ड्याचा तर आहे पण त्यात यदा कदाचित गाडी अडकून मनूष्य, महिला पडली तर प्रथम डोक्याला दुखापत होते. "म्हणून हे हेल्मेट. तेव्हा या सक्तीचे आम्लेट न करता सर्वांनी सहकार्य करा. नाही तरी ऊन्हात-थंडीत आपण डोक्याला टापरटोपी घालतोच. जास्त न लांबवता हे पुराण स्टाप करतो व मीसुद्धा थांबतो. स्वस्थ राहा सुरक्षित रहा.तुम्ही वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे.शुभ सकाळ शुभ दिवस आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना. सुप्रभात.

## ॥ श्री दत्त महिमा ॥



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड




### दत्त दिगंबर श्री अवधूत स्वामी दिगंबर श्री अवधूत

ज्योतिर्मय साहित्य

हा दत्त संप्रदायातील महामंत्र ज्या परमपूज्य श्रीमत वासुदेव वासुदेवानंद सरस्वती अर्थात टेंबे स्वामी महाराज यांनी दत्तभक्तांना प्रदान केला त्याच परमपूज्य टेंभी स्वामी महाराज यांचे व आद्यपीठ श्री वरद दत्त संस्थांचे अध्यात्मिक संबंध किती जवळचे होते हे आज आपण पाहणार आहोत.

पूजनीय टेंबे स्वामी महाराज यांनी त्यांच्या अखंड भारत भ्रमणात नर्मदा परिक्रमा अनेक केल्या मात्र गोदा परिक्रमा एक केली आहे असे त्यांच्या चरित्रात उल्लेख आहे ज्यावेळी गोदावरीपरिक्रमा केली ते साल शके १८३४ इसवी सन १९१२ यावेळी त्यांचा प्रवास जिंतूर, गंगाखेड, गुंज, पाथरी, मंजरथ, पाथरवाला, ‘‘राक्षसभुवन‘‘ आणि पैठण असा उल्लेख आढळतो.

त्यांच्या संन्यस्त जीवनात त्यांनी अनेक दत्तस्थानांचा प्रवास साधना अनुष्ठान केले त्यावेळी त्यांचे नित्य नियमाप्रमाणे एक व्रत होते ज्या



निवासस्थानी नित्य पूजा, नैवेद्य, वैश्वदेव केला जातो व स्ववस्य ध्येनु आहे. अर्थात वासरासह गाय असावी त्याप्रमाणे त्यांनी राक्षसभुवन क्षेत्री माहिती घेतली त्यावेळी त्यांना या अन्नपूर्णा मठाची माहिती कळाली त्याप्रमाणे मठामध्ये भोजन व्यवस्था सांगून त्यांनी तीन दिवस दत्त बागेमध्ये असलेल्या छोट्या गुंफेमध्ये अनुष्ठान केले ज्या स्थानी या संस्थांचे सद्गुरु बाबा स्वामी महाराज यांची समाधी आहे व त्या स्थानी पाच लिंगासह शंकराची पिंडी स्थापित आहे या स्थानी त्यांनी अनुष्ठान केले व मग पुढे पैठण क्षेत्री प्रयाण केले यावेळी त्यांनी नाथ महाराजांची नित्य स्थानापन्न होण्याची जागाही दाखवली असा उल्लेख आढळतो या महान दत्तावतारी सत्पुरुषाचे व वरद दत्त संस्थानचे प्राचीन संबंध दर्शवतो एक सिद्धपुरुष आणि एक सिद्ध स्थान याचा अनोखा संगम या स्थानी आढळतो म्हणून या स्थानास दत्त संप्रदायांमध्ये अनन्य साधारण महत्त्व आहे

याच महामंत्रा चा नामजप आपण या वर्षी ३कोटी नामजप संकल्प गुरुपौर्णिमा ते दत्तजन्मोत्सव या काळात केलेला आहे तो निश्चित दत्त महाराज पुर्ण करून घेतील असा विश्वास आहे

याची माहिती व्हावी या हेतूने हा लेखन प्रपंच.

गुरुदेव दत्त कृपा करा

## ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



--------- वेळेचं महत्व --------

वेळेचं महत्व । जाणत नाही जो ।
दुर्भागी असे तो । जाणिजेजी ॥१॥
वेळेला किंमत । असते महान ।
राहो ह्याचे भान । सदोदित ॥२॥
निघून ती जाता । वेळ हातातून ।
मग पस्तावून । जाल तुम्ही ॥३॥
कोणाच्याही साठी । काळ ना थांबतो ।
निघून तो जातो । गुपचूप ॥४॥
कोणताही क्षण । दवडा ना व्यर्थ ।
कार्याने समर्थ । बना सारे ॥५॥
माधव हा म्हणे । काळ अन् वेळ ।
ओळखावे मोल । सदा त्यांचे ॥६॥

# ट्रॅक्टरच्या युगातही बैलांचे स्थान

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

**ज्योतिर्मय साहित्य**

बैल पोळा हा सण केवळ एक परंपरा नसून, शेतकऱ्याचे आपल्या पशूधनाप्रती असलेले अथांग प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा तो एक सोहळा आहे.यांत्रिक युगातही शेती आणि ग्रामीण संस्कृतीत बैलांचे स्थान अढळ आहे. आजच्या आधुनिक काळात ट्रॅक्टर, मळणीयंत्रे आणि विविध स्वयंचलित यंत्रांमुळे शेतीची कामे वेगाने होत असली, तरी भारतीय शेतीचा मूळ आत्मा असलेल्या बैलांचे महत्त्व पूर्णपणे कमी झालेले नाही.



आज शेतीमध्ये यांत्रिक क्रांती झाली आहे. नांगरणीपासून ते सुगीच्या कामांपर्यंत अनेक ठिकाणी ट्रॅक्टर आणि आधुनिक यंत्रांचा वापर वाढला आहे. यामुळे शेतकऱ्याचे श्रम आणि वेळ वाचत असला, तरी शेताच्या बांधावर आणि शेतकऱ्याच्या काळजात जे स्थान बैलाचे आहे, ते यंत्र कधीच घेऊ शकत नाही.

भारतीय संस्कृतीत बैल हा केवळ एक प्राणी नसून तो कुटुंबातील सदस्यासारखा पूजनीय मानला जातो. पोळा किंवा बेंदूर सारख्या सणांमधून शेतकरी बैलांबद्दलची आपली कृतज्ञता व्यक्त करतो. माणसाचे आणि बैलाचे हे भावनिक नाते कोणत्याही निर्जीव यंत्राशी कधीही जोडले जाऊ शकत नाही.

भारतात कृषी क्रांती झाल्यापासून शेती आधुनिक पद्धतीने केली जात आहे. शेतीच्या या आधुनिक पद्धतीत ट्रॅक्टर, मळणी यंत्र, कापणी, फवारणी, धान्य काढणे या सर्व प्रकारांमध्ये यंत्राचा वापर केला जात असला तरी आजही शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागात देखील शेतीसाठी बैल जुंपले जातात.

भारतामध्ये बहुतांश शेतकऱ्यांकडे अल्पभूधारक (कमी) जमीन आहे. अशा लहान आणि तुकड्या-तुकड्यांच्या शेतात किंवा डोंगराळ भागातील दुर्गम शेतीमध्ये मोठे ट्रॅक्टर चालवणे अशक्य असते. तिथे फक्त बैलजोडीच सहजतेने काम करू शकते.

विशेष म्हणजे ट्रॅक्टर खरेदी करणे, त्याचे इंधन (डिझेल) आणि देखभाल खर्च लहान शेतकऱ्यांच्या बजेटबाहेर असतो. याउलट, बैलांचा सांभाळ करणे आणि त्यांच्या माध्यमातून शेती करणे छोट्या शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अधिक परवडणारे ठरते. यंत्रांमुळे हवेचे आणि आवाजाचे प्रदूषण होते. तसेच ट्रॅक्टरच्या वजनामुळे शेतीची माती दबली जाते आणि कडक होते.

बैलांमुळे मातीची नैसर्गिक मऊपणा टिकून राहतो. शिवाय, बैलांच्या शेणापासाहून मिळणारे खत जमिनीची सुपीकता वाढवते, जे यंत्रे देऊ शकत नाहीत.पावसाच्या लहरीपणामुळे अनेकदा शेतात चिखल होतो, अशा वेळी जड यंत्रे चिखलात रुतून बसतात. मात्र, अशा कठीण परिस्थितीतही बैल शेतात चिकाटीने काम करतात.

ट्रॅक्टर हे एक निर्जीव यंत्र आहे, जे इंधनावर चालते. पण बैल हा शेतकऱ्याचा सुख-दुःखाचा सोबती आहे. तो शेतकऱ्याची हाक समजतो आणि त्याच्या खांद्याला खांदा लावून शेतात राबतो. वर्षभर शेतात राबणाऱ्या या मुक्या प्राण्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोळ्याचा दिवस राखीव असतो. या दिवशी बैलांना कामातून विश्रांती दिली जाते, त्यांना नदीवर नेऊन अंघोळ घातली जाते, त्यांच्या पाठीवर नक्षीदार झूल, शिंगांना बेगड आणि गळ्यात घुंगरमाळा घालून सजवले जाते. तंत्रज्ञान कितीही बदलले तरी ग्रामीण संस्कृतीचा गाभा बदललेला नाही. पुरणपोळीचा नैवेद्य देऊन बैलांची मनोभावे पूजा करण्याची ही प्रथा आजही तितक्याच उत्साहाने जपली जाते.

थोडक्यात,

सांगायचे तर, ट्रॅक्टरने शेतीचे काम सोपे केले असेल, पण बैलांशी असलेले भावनिक नाते आणि मातीशी असलेली नाळ पोळ्याच्या माध्यमातून आजही तितकीच घट्ट आणि जिवंत आहे.यंत्रांनी शेतीला गती दिली असली, तरी बैलांनी शेतीला सत्त्व आणि जिवंतपणा दिला आहे. त्यामुळे कितीही आधुनिकीकरण झाले, तरी भारतीय शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत बैलांचे स्थान नेहमीच अढळ राहील.

# नांदेड सिटी डॉक्टर्स असोसिएशनतर्फे मोफत भव्य मेगा हेल्थ चेक-अप कॅम्प

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - नांदेड सिटी डॉक्टर्स असोसिएशन व रामराजे ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ (रविवार) रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत अँफीथियेटर मैदान,गणेश उत्सव मंडळ नांदेड सिटी पुणे येथे, नांदेड सिटी व आसपासच्या परिसरातील सर्व नागरिकांसाठी मोफत भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

आणि म्हणून नांदेड सिटी तसेच आसपासच्या परिसरातील सर्व गरजू नागरिकांनी आपल्या आरोग्याची मोफत तपासणी करून घेण्यासाठी सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड सिटी डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रख्यात नेत्रतज्ञ डॉ श्री अनिल दुधभाते व रामराजे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री शिरीष पाटील यांनी केले आहे. सध्याच्या नित्याच्या धावपळीत व वाढत्या ताणतणावात, निरोगी जीवनासाठी सर्वांनी एक पाऊल पुढे येऊन आपल्या आरोग्यासाठी वेळ देऊन आरोग्याची तपासणी करून घेणे काळाची गरज आहे. आपण स्वतः,तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांची तपासणी करून घ्या आणि परिचित व्यक्तींनाही या मोफत आरोग्यसेवेचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करा अशी विनंती ही दोन्ही संघटनांनी केली आहे.



प्रगतीशील ज्येष्ठ नागरी सेवा संस्थेतर्फ़े शिक्षक दिनाच्या निमित्ताने माझा संस्कृत शिक्षक म्हणून सत्कार करण्यात आला. हा सत्कार संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. रमेश कुळकर्णी यांच्या हस्ते करण्यात करण्यात आला. त्या प्रसंगी मी संस्कृत व भारतीय संस्कृती विषयी माझे विचार माण्डले. साधारणत: ३९ सभासद उपस्थित होते.

# बैल पोळा''कवितेचे कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी पोळ्याच्या पूर्व संध्येला शाळेत कविता शिकविली

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर - मराठवाड्याचे बाल साहित्यिक व सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांची इंग्रजी स्टेट बोर्ड माध्यमाच्या इयत्ता ५ व्या वर्गाला''बैल पोळा'', कविता मागील बारा वर्षांपासून राज्यभर विद्यार्थी शिकत आहेत.पोळ्याचे औचित्य साधत त्यांनी येथील सेंट मोनिका इंग्लिश माध्यमाच्या विद्यालयात जाऊन पोळ्याच्या पूर्व संध्येवर त्यांनी आपली ''बैल पोळा'' ही कविता विद्यार्थ्यांना शिकवून शासनाचे धोरण कवी विद्यार्थ्यांच्या भेटीला याचे दर्शन विद्यार्थ्यांना घडविले. कवितेचे कवी प्रत्यक्ष समोर येऊन कविता शिकवीत आहेत हे पाहून सेंट मोनिका इंग्लिश माध्यमाच्या विद्यालयातील विद्यार्थी खूप आनंदले. कवीला प्रत्यक्ष समोर पाहुन मुले आनंदली.कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी कवितेचे टाचन काढून कविता शिकविली. बैलांना पोळा दिनी जसे सजवितात तसे चित्र दाखवून, कविता गाऊन, प्रश्न विचारून व हसत-खेळत



कविता शिकविली.

''बैल पोळा'' कवींच्या द्वारे शिकण्याचा लाभ शंभर विद्यार्थ्यांनी घेतला. पोळ्याचे औचित्य साधत या शाळेच्या व्यवस्थापिका माजी नगराध्यक्षा शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी यांनी राजपूत यांना कविता शिकविण्यासाठी निमंत्रित केले होते. या प्रसंगी प्राचार्य किशोर साळुंके, सहाय्यक श्री.बापट,श्री सोनवणे, श्रीमती वर्षा, व वर्ग शिक्षकांनी सहाय्य केले.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'बहीण-भाऊ' (अतूट विश्वासाचा रेशीमबंध)

आपल्या संस्कृतीने या नात्याला 'रक्षाबंधन' आणि 'भाऊबीज' या दोन पवित्र सणांचे सोनेरी कोंदण दिले आहे. बहिणीने भावाच्या हातावर बांधलेला साधा सुती धागा हा केवळ धागा नसतो; तर तो भावाने आयुष्यभर बहिणीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याच्या विश्वासाचे अभेद्य संरक्षणकवच असते. भाऊबीजेला ओवाळताना बहिणीच्या मनात फक्त आणि फक्त आपल्या भावाच्या दीर्घायुष्याची आणि यशाची प्रार्थना असते. अनेक मराठी आणि हिंदी चित्रपटांत या नात्याचे सुंदर रंग भरलेले आढळतात. एका मराठी गीतात बहीण म्हणते, "ओवाळीते भाऊराया, वेड्या बहिणीची रे वेडी माया..." किंवा हिंदीतील एका अजरामर गाण्यात म्हटले आहे, "मेरे भैया, मेरे चंदा, मेरे अनमोल रतन, तेरे बदले मैं जमाने की कोई चीज न लूँ..." आपल्या भारतीय संस्कृतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, बहीण-भावाचे हे नाते केवळ रक्ताच्या नात्यापुरतेच मर्यादित नाही! (क्रमश:)

## अभावातून प्रभावाकडे...



अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495

### विचारांच्या पलीकडे-साक्षीच्या प्रकाशात वर्तमान

प्रेम हवे असते, सुरक्षितता हवी असते आणि इतरांनी आपल्या मूल्याची पुष्टी करावी अशीही इच्छा असते.
इच्छा असणे चुकीचे नाही.
समस्या तेव्हा सुरू होते, जेव्हा आपण एखाद्या बाह्य गोष्टीला आपल्या पूर्णत्वाची अट बनवतो.
आपल्याला वाटते—एखादी विशिष्ट व्यक्ती आपल्या आयुष्यात आली तर आपण पूर्ण होऊ. यश मिळाले तर शांतता मिळेल. पैसा वाढला तर भीती संपेल.
पण एक इच्छा पूर्ण होताच दुसरी इच्छा समोर उभी राहते.
जर आपली शांतता प्रत्येक इच्छा पूर्ण होण्यावर अवलंबून असेल, तर शांतता नेहमीच भविष्यात राहणार.
जागरूकतेचा अर्थ इच्छांना दाबून टाकणे नव्हे.
इच्छा कशी निर्माण होते आणि ती आपल्याला कशी चालवते, हे पाहणे म्हणजे जागरूकता.
जेव्हा आपण पाहतो की एखादी इच्छा आपल्याला कशा प्रकारे नियंत्रित करते, तेव्हा आपण तिच्यापासून थोडेसे वेगळे होतो.
इच्छा तिथेच असते; पण आपली संपूर्ण चेतना तिची गुलाम राहत नाही.
वर्तमानात जागृत होणे
वर्तमान क्षण आपल्याला अतिशय साधा वाटतो. आपल्याला वाटते की जीवन तेव्हाच चांगले होईल जेव्हा एखादी मोठी उपलब्धी मिळेल; एखादी समस्या संपेल; एखादी विशेष व्यक्ती आपल्या जीवनात येईल किंवा भविष्य सुरक्षित होईल.
अशा प्रकारे आपण वर्तमान भविष्याच्या अटीवर जगत राहतो.
परंतु आपले संपूर्ण जीवन हे वर्तमान क्षणांनीच बनलेले आहे.
भूतकाळ कधी काळी आपल्या समोर वर्तमान बनून आला होता आणि भविष्य जेव्हा येईल, तेव्हाही ते वर्तमान बनूनच येईल.
म्हणून वर्तमान गमावून भविष्य मिळवणे शक्य नाही.
वर्तमानात जगण्याचा अर्थ भविष्याची योजना सोडून देणे नव्हे. त्याचा अर्थ एवढाच—योजना करतानासुद्धा वर्तमानात राहणे. (क्रमश:)

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### चुकांमधून शिकणारेच पुढे जातात

पुढे.....
त्या व्रणांसहही आपण सुंदर आयुष्य जगू शकतो.
जर एखादं नातं तुमच्या चुकीने तुटलं असेल...
आणि माफी मागण्याची संधी असेल...
तर आजच मागा.
उद्या कोणाच्या हातात नाही.
जर आई-वडिलांशी मनात राग असेल...
तर एकदा त्यांच्या जवळ जाऊन बसा.
काही शब्द बोलायची गरज नाही.
फक्त हातात हात घ्या.
कदाचित त्यांच्याही डोळ्यांत तुमच्यासाठी खूप काही दडलं असेल.
जर स्वतःकडून एखादी मोठी चूक झाली असेल...
तर स्वतःलाही माफ करा.
कारण आयुष्यभर स्वतःला शिक्षा देत राहणं ही सुधारणा नाही.
सुधारणा म्हणजे चूक स्वीकारून पुन्हा चांगलं जगायला सुरुवात करणं.
लक्षात ठेवा...
आरशात दिसणाऱ्या त्या व्यक्तीला तुम्ही दररोज दोष देत असाल...
तर एक दिवस थांबा.
त्याच्याकडे प्रेमाने पाहा.
आणि म्हणा—
"हो... तू चुकलास. खूप चुकलास. पण तू शिकतोयस ना? मग चल... पुन्हा सुरुवात करूया."
कदाचित त्या दिवशी तुमच्या डोळ्यांत अश्रू येतील.
कारण इतक्या वर्षांत...
तुम्ही सगळ्यांना माफ करण्याचा प्रयत्न केला असेल.
पण...
स्वतःला माफ करायला विसरलात.
लक्षात ठेवा, पडलेला प्रत्येक जण संपत नाही. जो पडल्यानंतर स्वतःच्या चुकांमधून शिकून, अश्रू पुसून पुन्हा पेटून उठतो, तोच या जगात महाविजयाचा धनी होतो.
आजचे हे अश्रू उद्याच्या तुमच्या यशाची मुक्ताफळे बनतील!

# जपताना आठवणी श्रावणाच्या..!

**ज्योतिर्मय साहित्य**

सूर्यप्रकाशाचा किरण
कोमल ह्दयी हरवतो
पानावरचा थेंब तो..!!

आज उगी हळुवार घरंगळतो. गेल्या काही दिवसात विसावलेला पाऊस आणि मध्येच येणारी सर आणि पानावर पडलेला पावसाचा थेंब ही सारी निसर्गाची रुपे अर्थात त्या मंद धुंद श्रावणातलीच, म्हणायचे एवढेच की जीवनाच्या वाटेवर चालताना अगदी अशीच अनेक रूपे अनुभवत आपण पुढे जात असतो. निसर्गाचे हे सृष्टी चक्र अव्याहतपणे सुरू असते.आणि त्याच प्रवाहाबरोबर चालणारे आपण त्या क्षणाला मुठीत पकडून एका सकारात्मकतेच्या वाटेवर मार्गस्थ होतो.त्यातील काही क्षण नकोसे ही वाटतात. पण काही क्षण किती सुंदर असतात ना! अशाच त्या मनभावन आठवणीत हरवताना

ऊन सावली पावसाचा खेळ, भक्तीने भारावलेले मन, व्रत वैकल्ये माहेरच्या अंगणात जाऊन माहेरच्या आठवणी मनाला अगदी चिंब करून जातात.आणि आठवणीच्या रूपाने मनाच्या एका हळव्या कोपऱ्यात स्मृती होऊन विसावतात.

फिरणारे हे कालचक्र, निसर्गाची ही रूपे जीवनाशी किती सलग्न असतात. कधी इंद्रधनुतल्या रंगात उतरतात. कधी हिरवीगार हिरवाई, तर कधी सोनेरी रंगात तर कधी भिजणाऱ्या पानाआडून सुखावतात, तर कधी त्यावर पडलेल्या उन्हात निववतात. खळाळून वाहणारे झरे, आणि कोमल मनात उमलेले ते फुल, अर्थात दोन दिवसापूर्वी म्हणजे सहज म्हणून मंदिरात गेल्यानंतर निर्माल्यात पडलेले ते फुल दिसले. आणि विचार आला आज हे का उमलले असेल बरे. परमेश्वर चरणी जाण्यासाठी का ? वगैरे वगैरे अनेक प्रश्न मनात उभे राहिले.यावरून असे वाटते की या चराचरातील प्रत्येक घटक आणि त्याचे निसर्गाशी असलेले नाते याचा समन्वय साधण्याच्या प्रयत्न एक कवी मन करत असते.पण त्याच फुलांने जीवनाच्या एक क्षणाचे उदाहरण दिले. आणि विचार करायला भाग पाडले.परवा कुंडीतील गुलाबाच्या झाडाला आलेले फुल न तोडता तसेच ठेवले. पण त्याच्या त्या गळणाऱ्या एक एक पाकळ्या हरवलेल्या क्षणांची आठवण करून देत होत्या आणि मग अशाच..त्या आठवणी आणि भक्तीने भारावलेले ते क्षण , श्रावणाचा आनंद द्विगुणित करून गेले.आणि शब्द शब्दातून मनाला भावलेले विचार शब्दातून गुंफले गेले.

पूर्वी सण वार जीवनशैली नात्यांचा गोतावळा या साऱ्यांची विशेष आठवण झाली. पूर्वी कसे आणि आत्ता धावपळीच्या, स्पर्धेच्या या जगात आपण काही मागे सोडून पुढे चाललोय का? आणि एका क्षणाला आठवण झाली ती कुठल्याशा एका ओढ्याच्या काठावर असलेल्या शेतातून मेंदीच्या झाडाची पाने तोडून आणून त्याची मेंदी तयार करणे काडीने मेंदी लावणे, झिम्मा फुगड्या, फेर त्यावेळी मला ही आठवते, गावात फक्त एक दोन ठिकाणीच मेंदीचे झाड होते. खूप मेहनतीने त्या झाडाचा पाला कसा कसा आणून तो मोठ्या दगडावर वाटून त्यामध्ये कात घालून वाटायचे त्याचे पाणी वगैरे काढून ती मेंदी लावायची. आणि हे करताना त्यातून मिळालेला आनंद काही



औरच होता.म्हणजे त्यावेळेला मनोरंजनाची साधने कमी होती म्हणून असेल कदाचित हे एवढ्यासाठी की त्यावेळी मिळणाऱ्या त्या वस्तू आणि आत्ता सहज उपलब्ध असणाऱ्या त्या वस्तू यामध्ये खूप फरक जाणवतो.

सद्य स्थितीचा विचार करता त्यावेळी सण वार रूढी परंपरा सामाजिक सलोखा जपत एका सकारात्मकतेच्या वाटेवर घेऊन जायचा. आत्ताही असे होते नाही असे नाही पण आता स्पर्धेच्या या युगात माणसाची चाललेली एकमेकांची स्पर्धा, धावाधाव, रूटीन यामध्ये या वाटा हरवल्या आहेत असे वाटत राहते. गेले ते दिवस उरल्या फक्त आठवणी.

दूर वळणावरच्या आडवाटा
आठवणींचा रुततो काटा
अस्पष्ट धूसर धुक्यात
दूर हरवल्या त्या वाटा..!

दूर हरवल्या त्या वाटांवर श्रावणातली ती ऊन सावलीत बरसत येणारी सर नजरेत भरली, पानावरचा तो एक थेंब मनाला एक अद्वितीय असा आनंद देऊन गेला.कुठेतरी खळाळत निर्झरातून वाहणारे पाणी

शुभ्र धुक्यातल्या डोंगर दऱ्या, स्वच्छ नितळ अशी झालेली ती धरती, आणि त्यावर पडलेले ऊन, हिरवीगार शाल आणि त्यावर उमटलेली नक्षी धबधब्यातून वाहणारे पांढरेशुभ्र पाणी आणि भक्तिरसाने भारलेले ते वातावरण आणि त्यावरून

धुक्यातला तो एक थेंब
आज मनातून घरंगळतो,
श्रावणाच्या त्या सरींत
चिंब चिंब भिजवतो.

आणि अशाच एखाद्या वेलीवर पानआडून डोकावणारी ती सुंदर कळी त्या ऊन सावलीत डोकावताना सुरेल सुरांचे गीत गाताना मनाचे अत्युच्च शिखर गाठते. आणि दोन ओळी गुणगुणव्या वाटतात.

प्रसन्नतेने भारावलेले वातावरण मनाला आनंद देत ऊन सावलीत विरते. आणि अशा भारलेल्या वातावरणात त्या टवटवीत झोक्यावरची ती फुले मनाला ताजी टवटवीत करतात. मंगळागौरीचे खेळ, शिवशंभूच्या मंदिरातील पिंडीवरचे शुभ्र फुल आज मनाच्या आशा पल्लवित करते. आणि अशा भारावलेल्या क्षणी ओठांवर येते..

श्रावणाच्या सरींत चिंब
मन भक्तिरसात भारवते,
शिवशंभूच्या पिंडीवरचे
शुभ्र फुल हळूवार फुलते..!

थोडासा विसावलेला पाऊस, कुठेतरी कळ्यातून उमलायला लागलेली फुले स्वतःमध्ये ऊन सावल्या समावताना एका विस्मयकारक अवस्थेतून जातो. आणि अशा वेळी निसर्गाची वेगवेगळी रूपे अनुभवताना मन मोहरुन जाते.




श्रावणाचे किती रंग
जणू इंद्रधनुत सामावलेले
कधी उन्हात चमकलेले
तर कधी थेंबात भिजलेले.

हळूवार बरसणाऱ्या त्या सरींनी सृष्टीला दिलेले नवचैतन्य आणि हिरव्यागार झालेली राने एकमेकींना सावरत हातात हात घालून फेर धरूनी नाचू लागतात. असा सुंदर भास होतो आहे असे वाटत राहते, आणि त्याच तालावर फेर धरून नाचणाऱ्या लता वेली, पक्षी जीवनाचे एक नवे गीत गाताहेत असे वाटते.

सरीवर आली सर
धुंद झाल्या लता वेली,
ऊन पावसाचा चाले खेळ
धरा चैतन्याने भारावलेली.

श्रावणाने भारावलेले मन, सृष्टीतील चराचराला प्रसन्न करते. ओढ्या नद्यांतून वाहणारे पाणी त्याचा खळखळ आवाज निसर्गाचे गाणे माहेराला आलेल्या माहेरवासिनींना घरातील लेकी बाळींना तृप्ततेचा आनंद देते.

श्रावणात अनेक व्रत, वैकल्ये, उपवास याची अगदी रेलचेल असते. आणि अशा वेळी कवी मनाला काव्य नाही सुचले तर त्यात नवल ते काय! माहेरच्या अंगणात आठवणीत हरवलेल्या लेकीला न्हाळताना भरून येणारे डोळे वास्तल्यात पाणावतात. आणि अशा एका संवेदनशील क्षणाला एका नव्या काव्याची निर्मिती होते

आणि सहज शब्द शब्दातून..
पाणावलेल्या डोळ्यांतून
त्या वात्सल्य आज झरते,
ऊन सावलीतले गीत मनाला
हळूवार आनंदाश्रुत भिजवते.

असा हा मनभावन श्रावण ओलेत्या सांजवेळी पापणीतून घरंगळतो आणि आठवणीत हरवतो.

---


# बैलांचा सण – बैल पोळा

**ज्योतिर्मय साहित्य**


आज ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व माहिती मुळे कृषी क्षेत्रात ही विविध यांत्रिक साधने जरी वापरात असली तरी आजही शेतकरी जीवनात बैलांचे महत्व कमी झालेले नाही. बैलांना आजही शेती क्षेत्रात खूप महत्व आहे. बैलांच्या सहाय्याने आजही शेतीतील बरीच कामे करण्यात येतात. बैलांशीवाय शेती आजही अपूर्णच आहे.देशातील विविध राज्यात बैलांचा उत्सव ''बैल पोळा'', वेगवेगळ्या नावाने साजरा करतात. बळीराजाचा जीव व प्राण असलेले बैलांचा सण पोळा दर्श अमस्येला असतो, पोळ्याच्या आदल्या दिवशी किंवा पोळ्याच्या दिवशी सकाळी बळीराजा आपल्या बैलांना चांगली आंघोळ घालतात. पोळ्याच्या दिवशी त्यांची शिंगे रंगविणे, त्यावर विविधरंगी बेगड लावणे, बैलांच्या गळ्यात कवड्याच्या माळा तसेच घुंगर माळा ही बांधतात, पाठीवर झुली टाकतात, काही शेतकरी बांधव बैलांच्या सर्वांगावर रंगबेरंगी ठिपके काढून सजवतात,



वेसण ही नवी असते, व दोर ही नवा असतो. सायंकाळी बैलांना घेऊन बळीराजा गावा बाहेरील मारोती मंदिर, किंवा संकट मोचन मंदिर समोर नेतात. तेथे मारोती चे दर्शन होते, श्रीफळ फोडतात. गावातील वेशीला आंब्याच्या पानांचे तोरण बांधतात, मारूतीचे दर्शन झाले की, बैलांना सुसाट पळविण्याची शर्यत जणू सुरू होते. वेशीला असलेले तोरण तोडणे या साठी धावपळ असते. सजलेले व नटलेले बैल गावभर पाठवितात व शेवटी बळीराजा बैलांना घेऊन घरी येतात. घरमालकीन बैलांची पुजा करते व बैलांसाठी बनवलेले पूरण पोळी नैवेद्य तसेच काही धान्य त्यांच्या पुढे ठेवतात. पोळ्याच्या दिवशी बैलांना कोणत्याही प्रकारच्या औताला किंवा कामाला जुंपत नाही.सण बैल पोळा साजरा केल्याने शेतकरी मन प्रसन्न व आनंदी असतात.निसर्ग देवतेला प्रार्थना करून आमच्या पशुधनाला सुखी ठेवा भरपूर पाऊस पडो, शेती छान पिको, गोठ्यात गो धनाची वृद्धी होवो अशी विनवणी केली जाते. अशा प्रकारे शेतकरी दादा बैलांचा सण ''पोळा'' साजरा करतात.




***




---



**पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण (भाग-५)**

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्–bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३

**योजन' म्हणजे किती? प्राचीन मापन आणि आधुनिक रूपांतरण**

उत्तरार्ध.....
ही बाब महत्त्वाची आहे, कारण काही लोकप्रिय लेखांमध्ये प्राचीन ग्रंथातील संख्यांना आधुनिक खगोलशास्त्रीय आकड्यांशी जुळवून दाखवण्याचा प्रयत्न केला जातो, परंतु अशा तुलना करताना कोणते मापन-एकक वापरले, त्याचा स्रोत काय आहे आणि मूळ ग्रंथातील संख्येचा संदर्भ काय आहे, हे स्पष्ट केले नाही तर निष्कर्ष दिशाभूल करणारा ठरू शकतो.
मग या मोजमापांचे महत्त्व काय?
येथेच आपल्या अभ्यासाचा दृष्टिकोन अधिक सूक्ष्म होतो. विष्णुपुराणातील अंतर आधुनिक खगोलशास्त्रातील वास्तविक अंतरांशी जुळत नसले, तरी त्या वर्णनाचे ऐतिहासिक महत्त्व कमी होत नाही, कारण पुराणकार विश्वातील विविध आकाशीय घटकांना क्रम, स्तर आणि संख्यात्मक अंतर देऊन एक सुसंगत विश्वरचना उभी करतो. ही विश्वरचना आधुनिक भौतिक विश्वाचे अचूक प्रारूप नाही; परंतु ती प्राचीन भारतीय अवकाश प्रारूप अशी विश्वकल्पना म्हणून अभ्यासण्यास महत्त्वाची आहे. याशिवाय, पुराण परंपरे बरोबरच भारतात विकसित झालेल्या गणितीय खगोलशास्त्राचा स्वतंत्र इतिहास आहे. आर्यभट, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त आणि भास्कराचार्य यांच्या परंपरेत ग्रहगती, कालगणना, ग्रहण, त्रिकोणमिती आणि खगोलीय-गणित यांचा अधिक गणिताधारित विकास झालेला दिसतो, म्हणून 'पुराणातील विश्वकल्पना' आणि 'भारतीय गणितीय
खगोलशास्त्र' या दोन परंपरांचा गोंधळ न करता त्यांचा स्वतंत्र अभ्यास करणे अधिक योग्य ठरेल.

■ एक महत्त्वाचा निष्कर्ष
यातून आपण आतापर्यंत तीन गोष्टी स्पष्टपणे सांगू शकतो:
१) विष्णुपुराणात आकाशीय वस्तूंच्या परस्पर अंतरांची संख्यात्मक मांडणी आहे.
२) 'योजन'चे आधुनिक रूपांतर निश्चित आणि निर्विवाद नाही; त्यामुळे आधुनिक किलोमीटरमध्ये रूपांतर करताना गृहीतके स्पष्ट करणे आवश्यक आहे.
३) उपलब्ध एका सामान्य योजन-मूल्याच्या आधारे पृथ्वी–सूर्य अंतराची थेट तुलना केली असता ते आधुनिक मूल्याशी जुळत नाही.
ही भूमिका बाब विशेष महत्त्वाची आहे, कारण आपला उद्देश पुराणातील प्रत्येक आकडा आधुनिक विज्ञानाशी जबरदस्तीने जुळवणे हा नसून, प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेने विश्वाकडे कसे पाहिले आणि त्या विश्वकल्पनेचे आधुनिक विज्ञानाच्या प्रकाशात नेमके मूल्यमापन कसे करावे, हा आहे.
आता पुढील प्रश्न अधिक रोचक आहे. जर विष्णुपुराणातील ही विश्वरचना आधुनिक खगोलशास्त्राशी तंतोतंत जुळत नसेल, तर प्राचीन भारतीय खगोलज्ञानाचे खरे वैज्ञानिक योगदान कुठे शोधायचे?
त्याचे उत्तर आपल्याला पुराणांपेक्षा काही अंशी वेगळ्या ग्रंथपरंपरेत म्हणजे वेदांग ज्योतिष, सूर्यसिद्धान्त आणि आर्यभटीय यांसारख्या गणितीय-ज्योतिषीय ग्रंथांमध्ये शोधावे लागेल.
क्रमश: पुढील भाग – ६: 'पुराणांची विश्वकल्पना' आणि 'भारतीय गणितीय खगोलशास्त्र' यांतील फरक.

# आठवणीतलं गाव माझे गाव परभणी


माझ्या आठवणीतलं गाव म्हणजे माझे गाव परभणी. परभणी नाव आलं की मनी पुन्हा पुन्हा साऱ्या आठवणी जाग्या होतात आणि नकळत नयनी पाणी येतं.आज मी थोडसा बोअर झालो म्हणुन माझ्या जवळ असलेला आठवणींचा बटवा उघडला.

त्यात ज्या आठवणी होत्या त्या पुन्हा आज ताज्या झाल्या. मुलींच्या उच्च शिक्षणासाठी बदली करून घेऊन जुलै २०१५ ला माझे मुळ गाव परभणी सोडून औरंगाबादला आलो. परभणीला बालपण, शालेय जीवन महाविद्यालयातील काही काळ , नात्यातील बंध आणि त्या बंधातील आनंद , आनंदातील सुगंध आणि आणखी बरेच काही सुंदर क्षण आठवणीचा बटवा बांधण्यासाठी मिळाले ते सोबत बांधून घेतले. तसेच मनावर दगड ठेवून माझ्या गावची थोडी माती, छोटीशी सुंदर पुरचुंडी करून घेऊन त्याची आठवण आली की सुगंध घेण्यासाठी सोबत घेतली.

मन खुप भरून आलं होत. आभाळ फाटल्यागत मनाची अवस्था झाली होती. पण पर्याय नव्हता. मुलींच्या भविष्यासाठी काळीज घट्ट ठेवले आणि स्वतः बांधलेल्या घराला दुसऱ्याला किरायाने का होईना देऊन हवाली केलं. शेजारी मंडळी अतिशय माणुसकीची होती. त्या सर्वांना भेटून निघताना पुन्हा एकदा नजर घराकडे वळली तेव्हा जाणवलं की ते घर माझ्याकडे बघून रूसलं होतं .जणू मला विचारत होतं ? याच करीताच केला होता का अट्टाहास मला बांधून सुंदर बनविण्याचा ? आणि माझ्या नाकावर आसवं टपकली होती. चष्म्याच्या आड आसवं लपविण्याचा अनाहूत प्रयत्न रचनाच्या (बायको) तीक्ष्ण नजरेने केव्हाच हेरला होता. (कदाचित डोक्यावर केसांचा बट असला असता तर निभावले असते ते ही ) भानावर आलो, जेव्हा रचनाने विचारले रडताय की काय ? नाही गं, डोळ्यात थोड़ी धूळ गेली म्हणुन हलकेच डोळे पुसले.

ज्या गावाने जीवाभावाची विलक्षण प्रेमळ अशी मित्र मंडळी दिली, त्यांच्या सोबत तेथे असे पर्यंतच खोटं भांडण, कट्टी दो चा खेळ, गप्पाचं गाठोडं, सुखाचे क्षण, तेथे असताना आलेल्या दुखा:वर घातलेली फुंकर आणि मैत्रीचा आयुष्यभर दरवळ राहणारा सुगंध ही आठवणीच्या वेगळ्या कप्प्यात घेतला. शालेय जीवन संपल्या नंतर ही दसऱ्याला आणि रंगपंचमीला आम्ही मित्र मंडळी आवर्जून भेटत असू. त्या सोनेरी क्षणांच्या आठवणी आल्या की आपसूकच डोळ्यात पाणी येतं.

हा योग पुन्हा येईल असं सांगून मनाला आवर घालत असतो आणि पुन्हा त्या जीवंत




क्षणांची आतुरतेने वाट पहात असतो.

टेलिफोन ऑफीसमधे परभणीला २१वर्ष काम केले. तेथील प्रत्येक व्यक्ती सहकारी मित्र, अधिकारी आणि भगिनीनी मला समजून निघताना दिलेला निरोप अविस्मरणीय असाच होता. माहीत नाही मी पुर्वजन्मी काय पुण्य केले होते ? की मला इतकी सुंदर मित्र मैत्री, नाती, शेजारी अन स्नेही मिळाले. या सर्वांना सोडून माझे मुळ गाव परभणी सोडून निघालो. सामानाच ट्रक पुढे गेला होता आणि मागून आम्ही टॅक्सीने निघालो. आणि टॅक्सी चालकाने गाण्याची टेप लावली आणि वेगवेगळे विलक्षण योगायोग असल्यासारखे जे गाणे लागल ते होतं ते ही माझा मित्र व प्रसिद्ध

कवी दासू वैद्य याचं.

''वाऱ्यावरती गंध पसरला नाते मनाचे
माती मधे दरवळणारे हे गाव माझे.

आणि पुन्हा एकदा मन भरून आले .

नकळत पुन्हा डोळ्यातून अश्रू टपकु लागले आणि रचनाने ते पुन्हा हेरले आणि मला म्हणाली अहो, गेलात का पुन्हा परभणीच्याआठवणीत? आपण आता पुणेकर झालो आहोत, कायमसाठी, आणि पुन्हा भानावर आलो.

अशी ही माझी परभणी. जगात कोणत्याही शहरात जा,पण आपल्या गावाच्या आठवणी, येथील मातीचा तो सुगंध, आठवणीच्या कप्प्यात कायमच दरवळत असतो. तुमचं ही असंच होत असेल ना, तुमच्या गावाबद्दल? हो ना?

****

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559